## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

### अपिल क्रमांक : के.आर-१६७/२०२३

**अपिलार्थी, श्री.कैलास चंद्रकांत पाटील,**
**मु.सरवलीपाडा, शिव मंदिराच्या पाठीमागे,**
**पो.सरवली, एमआयडीसी, ता.भिवंडी,**
**जि.ठाणे ४२१ ३११.**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी, (ग्रामपंचायत विभाग), पंचायत समिती भिवंडी यांचे कार्यालय, तहसिल कार्यालय जवळ, ता.भिवंडी, जि.ठाणे ४२१ ३०८.

प्रथम अपीलीय प्राधिकारी, पंचायत समिती भिवंडी यांचे कार्यालय, तहसिल कार्यालय जवळ, ता.भिवंडी, जि.ठाणे ४२१ ३०८.

**व्दितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : १६.४.२०२६**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १९.१०.२०२२ | ----- | २३.११.२०२२ | ------ |

अपिलार्थी यांनी दि.२०.१.२०२३ रोजीच्या अर्जान्वये "विहित मुदतीत माहिती प्राप्त झालेली नाही." असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर व्दितीय अपिल अर्जात त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेवर दंडात्मक कारवाई करण्यात यावी अशी विनंती केली आहे.

सदर व्दितीय अपिलावर आज दिनांक १६.४.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. संतोष सखाराम भाकरे, ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत वेढे आणि विद्यमान प्रथम अपिलिय अधिकारी श्रीम. रेखा भगवान भरोसे, विस्तार अधिकारी, पंचायत समिती भिवंडी या उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

*" (आपल्या कार्यक्षेत्रातील ग्रामपंचायत वेढेगांव येथे कार्यरत कुशल, अर्ध-कुशल व अकुशल, कर्मचाऱ्यांची अद्यावत माहिती मिळणेबाबत.) "*

*"(१. कर्मचारी नियुक्ती होण्याकामी ग्रामसभा व मासिकसभाच्या ठरावाची प्रत. २. कर्मचा-यांची नियुक्ती होण्याकामी वृत्तपत्रात दिलेल्या जाहिरातीची प्रत. ३. नियुक्तीसाइी शासनाच्या विहित निकषानुसार निवड केलेल्या व निवडीस उपस्थित असलेल्या उमेदवारांची यादी व शैक्षणिक प्रमाणपत्र व तांत्रिक अर्हता साक्षांकित नक्कल प्रत. ४. मुद्दा क्र. २ अन्वये ग्रामपंचायत कार्यालयात प्राप्त अर्जाची नक्कल प्रत. ५. ग्रामपंचायत कार्यालयात कार्यरत कुशल, अर्ध-कुशल व अकुशल कर्मचा-यांचे नियुक्ती आदेश. ६. कर्मचा"यांचे सरळसेवा बिंदुनामावली (मागासवर्गीय कक्ष प्रमाणित) ७. उक्त कर्मचा-यांच्या बाबतीत कार्यालयास प्राप्त कर्मचा-यांच्या बाबत तक्रारी अर्ज व तक्रारी अर्ज अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल.)"*

तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये "तीस दिवसांत माहिती प्राप्त झालेली नाही." असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

या प्रकरणी विद्यमान प्रथम अपिलिय अधिकारी श्रीम. रेखा भगवान भरोसे, विस्तार अधिकारी, पंचायत समिती भिवंडी यांनी असे निवेदन केले की, अनावधानाने या प्रकरणी अपिलार्थीस माहिती दयावयाचे राहून गेले आहे. सुनावणी दरम्यान त्यांनी अपिलार्थींना दयावयाच्या पत्राची प्रत आयोगास सादर केली. या पत्राव्दारे जन माहिती अधिकारी यांनी दि.१५.४.२०२६ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थींना ग्रामपंचायत वेढे येथे नियुक्त झालेल्या दोन कर्मचा-यांच्या संदर्भात त्यांचे नाव, पद, संवर्ग व नियुक्ती आदेश अशी माहिती दिलेली आहे. तथापि, या माहितीमध्ये ज्या ठरावाव्दारे या कर्मचा-यांची नियुक्ती करण्यात आली त्या ठरावाची प्रत तसेच वृत्तपत्रात दिलेल्या जाहिरातीची प्रत, त्यांचे शैक्षणिक प्रमाणपत्र, शैक्षणिक अर्हता या पदासाठी

ग्रामपंचायतीकडे प्राप्त झालेल्या अर्जांची नक्कल, नियुक्तीचे आदेश, बिंदूनामावली व कर्मचा-यांबाबत प्राप्त तक्रारी अर्ज व त्या अनुषंगाने केलेली कार्यवाही इ. माहितीचा समावेश नाही. सबब, अपिलार्थी यांना माहिती मिळण्यास झालेल्या विलंबाबद्दल विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. आशिष चव्हाण, ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय वेढे यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये प्रति दिवस रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची आकारणी का करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. आशिष चव्हाण यांनी पुढील सुनावणीस आयागोकडे स्वत: उपस्थित राहून सादर करणे उचित होईल. त्याचप्रमाणे विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी मागणी केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती पुढील १५ दिवसांत शीघ्र टपालाने विनामूल्य पुरविणे उचित होईल. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. **विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय वेढे यांनी अपिलार्थी यांनी मागणी केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती पुढील १५ दिवसांत शीघ्र टपालाने विनामूल्य पुरवावी. जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.**

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. आशिष चव्हाण, ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय वेढे यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक १९.१०.२०२२ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत अथवा त्यानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये प्रति दिवस रु. २५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची आकारणी का करण्यात येऊ नये, **याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे दि.१४.५.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता स्वत: उपस्थित राहून सादर करावा. अन्यथा, प्रस्तुत प्रकरणी त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.**

३. **प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१४.५.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.**

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १६ एप्रिल, २०२६

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. आशिष चव्हाण, ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय वेढे, मु. वेढे, ता. भिवंडी, जि. ठाणे.

**-यांना प्रत**
विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. संतोष तुकाराम भाकरे, ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय वेढे, मु. वेढे, ता. भिवंडी, जि. ठाणे **यांचेमार्फत रवाना**.

**(विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना सदरची नोटीस न बजाविल्यास त्यांना जबाबदार धरण्यात येईल).**